"कोरोना" प्रादुर्भावाचा मुकाबला करण्यासाठी
आवश्यक खर्चास आर्थिक निर्बंधातून वगळण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग

शासन परिपत्रक क्र.: संकीर्ण - २०२०/प्र.क्र. ५९/२०/कोषा प्रशा-५

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: १८ मार्च, २०२०.

संदर्भ : वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.४/२०/कोषा प्रशा-५, दि.३० जानेवारी, २०२०

शासन परिपत्रक:

आर्थिक वर्षाअखेरीस अनावश्यक अथवा प्राधान्यक्रम नसणाऱ्या बाबींवरील खर्च निर्धारित व नियमित करण्याच्या दृष्टीने काही बाबींवरील खर्चाच्या प्रस्तावांवर उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये निर्बंध घालण्यात आलेले आहेत.

२. त्यानुसार दि. १ फेब्रुवारी, २०२० नंतर अशा बाबींच्या खरेदीस मान्यता देण्यात येत नाही. संदर्भाधीन शासन परिपत्रकातील परि.२ मध्ये औषध खरेदीवरील बाबीस अपवाद म्हणून करण्यात आले आहे. तथापि राज्यातील "कोरोना" आजाराचा प्रादुर्भाव विचारात घेता, त्याचा मुकाबला करण्याकरीता आवश्यक असणाऱ्या औषधे, उपकरणे, यंत्रसामुग्री तसेच तत्सम साहित्य व सेवा यावरील खर्चास संदर्भाधीन शासन परिपत्रकातील निर्बंधातून सूट देण्यात येत आहे.

३. प्रचलित नियमांच्या आधारे याबाबतच्या खर्चावर आवश्यक ती कार्यवाही सर्व संबंधितांना करता येईल. प्रस्तुत प्रकरणी निर्बंधातून सूट देण्याबाबतची प्रकरणे वित्त विभागाकडे मान्यतेस्तव सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०२००३१८१७२५३२८९०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

INDRAJEET SAMBHAJI GORE

Digitally signed by INDRAJEET SAMBHAJI GORE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=6015944fe7d58a83f4a54c43147b5da1e34861e2984e9f793b66f7249aaa9c1a, postalCode=400032, street=Y-5/66,GOVERNMENT COLONY,MUMBAI, serialNumber=d4994742192306fcc1dea9aadd3810639506519fa652b919767b98b04e905a18, ou=FINANCE DEPUTY SECRETARY, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=INDRAJEET SAMBHAJI GORE
Date: 2020.03.18 17:28:08 +05'30'

(इंद्रजित गोरे)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
२. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद सदस्य.
३. मा.राज्यपालांचे सचिव,
४. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
५. मा.उपमुख्यमंत्री यांचे कार्यालय,
६. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
८. मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख
९. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
१०. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई
११. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
१२. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१४. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२
१५. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन*, नागपूर ४४४००१
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१७.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१८. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
१९.प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२०. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२१.मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२२.विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२३.सर्व विभागीय आयुक्त
२४.सर्व जिल्हाधिकारी
२५.सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२६.संचालक , लेखा व कोषागारे, मुंबई
२७.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२८. संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.
२९.सहसंचालक,लेखा व कोषागारे,कोकण/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती
३०.सहसंचालक,स्थानिक निधी लेखा परिक्षा मुंबई /पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती
३१.वित्त विभागातील सर्व कार्यासने
३२.निवड नस्ती कोषा प्र.५.